महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाचे महाव्यवस्थापक यांनी केलेला गैरव्यवहार

(१) १३२७३ (१४-०९-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ (एमआयडीसी) चे महाव्यवस्थापक महेंद्र बोरसे यांनी त्यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला असून त्यांची पदोन्नती ही नियमाबाह्य करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदोन्नतीसाठी किमान कार्यकाळ हा शासनाच्या निर्णयाप्रमाणे ५ वर्षाचा असतांना त्यांना नियमाबाह्यरित्या सन २०१७ उप महाव्यवस्थापक व सन २०१९ मध्ये महाव्यवस्थापक पदी पदोन्नती देण्यात आलेली आहे, तसेच त्यांच्यावर कार्यालयातील महिलांवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याच्या तक्रारी ही पोलीसात दाखल झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (०७-११-२०२२) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३ व (४) श्री. महेंद्र बोरसे यांना महाव्यवस्थापक पदावर देण्यात आलेली पदोन्नतीबाबत मा. मंत्री (कृषि) यांनी चौकशी आदेश दिले होते. सदर चौकशी अहवालानुसार श्री. बोरसे यांची पदोन्नती नियमबाहय असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे, श्री. बोरसे यांचे पदोन्नतीचे आदेश रद्द करुन त्यांना उप महाव्यवस्थापक पदावर पदावनत करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे, श्री. बोरसे यांनी कार्यालयातील महिलेवर लैंगिक छळ व विनयभंग केल्याबाबत, आरे पोलिस ठाणे, गोरेगाव येथे तक्रार दाखल झाली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण मा. न्यायदंडाधिकारी बोरीवली, मुंबई न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना दिल्या जाणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराबाबत

(२) २८४४१ (०९-०६-२०२१). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार राज्य शासनाकडून दिला जात असुन गेल्या वर्षी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे रद्द करण्यात आल्यामुळे शिवछत्रपती पुरस्कार जाहिर करताना कोणती पात्रता असणार याबाबतची स्पष्टता नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कारासाठी शासनाने पात्रता निश्चित केली आहे काय,त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास,त्यानुसार या वर्षी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याबाबत शासनाची भूमिका काय असुन त्यानुंषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२८-०९-२०२२) :(१) व (२) व (३) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराची नियमावली सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.सदर नियमावली अंतिम झाल्यानंतर शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कासेगाव एज्युकेशन सोसायटीने महाविद्यालय उभारण्यासाठी शिरढोण येथे मिळविलेल्या जमिनीवर महाविद्यालयाची उभारणी न केल्यामुळे ग्रामस्थांची झालेली फसवणुक

(३) ३२७३९ (०६-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील कासेगाव एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेने अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यासाठी शिरढोण (ता.पनवेल, जि.रायगड) येथील १४ एकर जमिन सन २००४ या कालावधीत नाममात्र दरात ग्रामस्थांचा विरोध असतानाही घेतली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालय उभारण्यासाठी १५ ते २० वर्षापूर्वी घेतलेली जमिन अद्यापपर्यंत वापरा विना पडून असुन महाविद्यालयाची उभारणी न केल्यामुळे ग्रामस्थांची फसवणुक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमिनीच्या १४ एकर क्षेत्रफळापैकी २ एकर क्षेत्रफळ मुंबई–गोवा महामार्गासाठी सन २०१२ या कालावधीत संपादित करण्याचे जाहीर करण्यात आले यासाठी संबंधित शिक्षण संस्थेला सुमारे ६० लाख ३४ हजार रुपयांचा मोबदला
देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास , उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता त्यावर न्यायालयाचे जमिनीचे हक्क तसेच ठेवण्याचे आदेश असल्यामुळे जमिनीचा मोबदला ग्रामपंचायत तसेच सरकारी कोषागरात जमा करणे आवश्यक असताना तत्कालीन अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करून सदर संस्थेला मोबदला दिला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने महाविद्यालय न उभारता ग्रामस्थांची फसवणूक करणा-या तसेच जमिनीचा मोबदला घेणा-या कासेगाव एज्युकेशन सोसायटीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२२) : (१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड येथील स.नं.२९/०, स.नं.३०/०, स.नं.३९/०, स.नं.३१/०, स.नं.३४/०, स.नं.३५/० व स.नं.३६/० मधील क्षेत्र ५-६१.०० जमीन शासन ज्ञापन दिनांक १४.०७.२००४ तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक ३०.०८.२००४ च्या कार्यालयीन आदेशाद्वारे कासेगांव एज्युकेशन सोसायटी, कासेगांव ता.वाळवा जि.सांगली यांना शैक्षणिक प्रयोजनार्थ वितरित करण्यात आली आहे.

उक्त जमिनीपैकी स.नं.३० मधील १४०० चौ.मी. क्षेत्र व स.नं.२९ मधील १९६० चौ.मी. क्षेत्र मुंबई-गोवा महामार्गाकरिता संपादित क्षेत्राचा निवाडा दिनांक २९.०६.२०१२ रोजी घोषित करण्यात आला असून त्यामध्ये हरकत प्राप्त न झाल्याने मोबदला रक्कम रु.६०,३७,४७६/- श्री. रामचंद्र ज्ञानदेव सावंत, सहसचिव कासेगांव एज्युकेशन सोसायटी

यांना दिनांक ०८.०८.२०१२ रोजी अदा करण्यात आला आहे. उक्त जमिनी या शासकीय जमिनी असल्याने मोबदला वाटप करताना अनर्जित रक्कम शासन जमा न केल्याने सदर अनर्जित रक्कम वसुल करण्यात येत आहे.

सदर जमीन उक्त संस्थेस प्रदान केल्याविरुध्द ग्रुप ग्रामपंचायत, शिरढोण यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.०३/२००५ दाखल केली असून दिनांक ०३.१०.२००५ च्या आदेशान्वये जमीन हस्तांतरणाबाबत सदर आदेशास स्थगिती देण्यात आली आहे. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी होणाऱ्या आदेशांचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

भंडारा जिल्हास्तरीय क्रीडा संकुल प्रस्तावास मंजुरी प्रदान करुन निधी उपलब्ध करण्याबाबत

(४) ३३२०१ (१०-०१-२०२२). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, भंडारा येथे अनेक सोईसुविधांचा अभाव असल्याने क्रीडा संकुल अद्यायावत करण्यासाठी अंदाजपत्रके व आराखड्याचा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी, भंडारा यांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांची मान्यता घेवून आयुक्त क्रीडा व युवक कल्याण सेवासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक २९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त यांनी शासनास सादर केलेल्या ६२.७२ कोटी रुपये प्रस्तावावर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांचेकडे दिनांक ०१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवदेनाद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२२) : (१) भंडारा जिल्हा क्रीडा संकुल समितीने रु. ६२७२.४६ लक्ष रकमेचा प्रस्ताव क्रीडा व युवक सेवा संचालनालयास दि. ०६.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्य क्रीडा विकास समितीने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने जिल्हा क्रीडा संकुलाच्या टाईप प्लॅन नुसार भंडारा जिल्हा क्रीडा संकुलासाठी वास्तुविशारदामार्फत सुधारीत अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन ते सादर करण्याची कार्यवाही जिल्हा क्रीडा संकुल, भंडारा यांचे स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि (ता.दापोली जि.रत्नागिरी) विद्यापीठासाठी संपादित केलेल्या जमीनीबाबत

(५) ३३२५३ (०७-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी (ता.दापोली जि.रत्नागिरी) विद्यापीठासाठी संपादित केलेल्या एकूण ४१८ हेक्टरपैकी फक्त १८८ हेक्टर क्षेत्र वापरात आले असून उर्वरित २३० हेक्टर जमीन वापराविना पडून असल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित २३० हेक्टर अतिरिक्त विनावापर पडून असलेली पडीक जागा संपादित करण्यात आलेल्या शेतक-यांना परत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, तसेच सदर पडीक जागा परत मिळण्याची मागणी शेतक-यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शासनाच्या विचाराधीन प्रस्तावाच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१५-११-२०२२) :(१) मौजे टेटवली,ता.दापोली,जि.रत्नागिरी येथील एकूण ४१८.३१ हेक्टर क्षेत्राची जमीन डॉ.बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली करीता संपादीत केली असून प्रत्यक्षात १८८ हेक्टर इतकी जमीन दापोली कृषि विद्यापीठाच्या ताब्यात आहे.
(२) व (३) मौजे टेटवली, ता.दापोली, जि.रत्नागिरी गावातील ग्रामस्थांच्या विरोधामुळे २३० हेक्टर क्षेत्र जमिनीचा ताबा भूसंपादन अधिकारी आणि निरीक्षक भुमी अभिलेख, दापोली यांचेकडून सिमांकन करून डॉ. बाळासाहेब कोकण कृषि विद्यापीठाच्या ताब्यात देण्याचे काम शिल्लक राहिलेले आहे. केंद्र व राज्य शासनाकडून मंजूर होणाऱ्या नवनवीन प्रकल्पांना संशोधनासाठी टेटवली येथील संपादीत केलेली जागा कृषि विद्यापीठाकडे ठेवणे आवश्यक असल्याचे विद्यापीठाने कळविले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०५ मे १९९७ च्या न्यायनिर्णयानुसार शासनासाठी एकदा संपादीत केलेली जागा मूळ मालकांना परत करता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील १९ गावठाण क्षेत्रापैकी ५ गावठाणाचां सर्व्हे करण्याबाबत

(६) ३३३०७ (१७-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील १९ गावठाण क्षेत्रापैकी ५ गावठाणांचा सर्व्हे अद्याप करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोड मधील ३२८ (२) ३२९ अन्वये गावकऱ्यांना शासनाकडून सनद देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ५ गावठाणातील नागरीकांना सनद मिळालेली नसल्यामुळे मालमत्ता कार्ड त्यांच्याकडे नसल्यामुळे त्यांची मोडकळीस आलेली घरे दुरुस्त करण्यास आवश्यक असलेल्या परवानग्याही शासनाकडून देण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १९ गावठाणांपैकी ५ गावठाणांचे सर्व्हे करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थानिक रहिवाशांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्रव्यवहार करुन रहिवाश्यांना सदन व मालमत्ता कार्ड मिळावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-११-२०२२) :(१), (२) , (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १९ महसूली गावांपैकी सन २००६ ते २००८ या कालावधी दरम्यान १४ गावांचे भूमापनाचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित मौजे १) उत्तन २) डोंगरी, ३) पाली, ४) तारोडी, ५) चौक या ५ गावांतील स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे नियुक्त खाजगी संस्थामार्फत मोजणी काम नियत कालावधीत होवू शकलेले नाही. त्यामुळे महासभा, मिरा भाईंदर महानगरपालिका ठराव क्र.८८ दिनांक २६/०२/२०१८ अन्वये उपरोक्त ५ गावांतील प्रतिनिधींनी नगर भूमापन कामासाठी अनुकुलता नोंदविलेनुसार मोजणी काम सुरु करणेबाबत ठराव पारीत केलेला आहे. त्यानुषंगाने ५ गावांतील मोजणी काम नव्याने सुरु करण्याचे अनुषंगाने संस्थेची निवड करणे, सद्यस्थितीत दर व कालावधी ठरविणे याबाबतची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत अंतीम झाल्यावर, उक्त ५ गावांचे मोजणी काम व अभिलेख उपलब्ध करणेबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील मच्छीमार बांधवासाठी स्वतंत्र मत्स्यव्यवसाय विभागाचे कार्यालय स्थापन करण्याबाबत

(७) ३३३५९ (०६-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१४ या कालावधीत ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून पालघर व ठाणे अशा दोन स्वतंत्र जिल्ह्याची निर्मिती केली असताना ठाणे जिल्ह्यातील मच्छीमार बांधवांसाठी मत्स्यव्यवसाय विभागाचे कार्यालय अद्याप पालघर येथेच आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील मच्छीमार बांधवांना मत्स्यव्यवसाय संबंधित कामासाठी पालघर येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील मच्छीमार बांधवांसाठी स्वतंत्र मत्स्यव्यवसाय कार्यालय स्थापन करण्याचे शासनाकडुन प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील मच्छीमार बांधवासाठी स्वतंत्र मत्स्यव्यवसाय कार्यालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अस्लम शेख (१६-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

तथापि, ठाणे येथील मच्छिमारांना मासेमारी परवाने हे ठाणे जिल्हयातील परवाना अधिकारी, उत्तन या कार्यालयातून देण्यांत येतात.

(३) होय. हे खरे आहे.

(४) शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अतिवृष्टीमुळे राहिलेली कामे रोजगार हमी योजने मधून करण्याबाबत

(८) ३४५५२ (०७-०१-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील काही वर्षांपासून पर्जन्यवृष्टीचा पॅटर्न बदललेला असून सरासरी पर्जन्यमानाचे प्रमाण देखील अनिश्चित झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे राज्यातील बहुतांशी भागात विहिरी खचणे, शासनाच्या अधिपत्याखालील विविध जुन्या इमारती जसे व्यायाम शाळा, वाचनालय, पूर संरक्षक भिंती आदी इमारत भिंती खचणे अशा घटना सन २०२१ या कालावधीत घडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामे जिल्हा नियोजन समितीमार्फत (डीपीडीसी) करण्यात येत असल्याने मर्यादित निधीमुळे बहुतांशी कामे वर्षोनुवर्षे प्रलंबित राहत असल्याने उक्त कामे रोजगार हमी योजनेमधून करण्यात यावीत अशा मागणीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (०३-१०-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत बुलढाणा जिल्हा मुख्यालय येथे कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबत

(९) ३४८७१ (०७-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत बुलढाणा जिल्हा मुख्यालय येथे विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या जागेवर शासन अनुदानित घटक कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील कृषि महाविद्यालय बुलढाणा मुख्यालय स्थापन करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठाच्या कार्यकारी परिषद व कृषि परिषदेच्या मान्यतेने शासनास प्राप्त झाला असुन कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा निश्चित करण्याचे विचारधीन असून सदरचा बृहत आराखडा अंतिम झाल्यानंतर उक्त प्रस्तावाबाबत निर्णय घेण्यात आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने लेखी निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (२२-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत बुलढाणा येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्याबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने ठराव क्र.०६/९६/२०१८ संमत करुन प्रस्ताव शासनास शिफारशीत केला आहे. त्यानुषंगाने बुलढाणा येथे कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर केला असता, डॉ.एस.एस.मगर समितीने तयार केलेला कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा अंतिम झाल्याशिवाय नविन महाविद्यालयांचे प्रस्ताव सादर करण्यात येऊ नये, असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत.

कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा अंतिम करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी व इतर पैलवानांच्या विविध मागण्यांबाबत

(१०) ३५४८५ (१०-०१-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी व इतर पैलवानांच्या मानधन वाढ, एस.टी.प्रवास सवलत, शासकीय नोकरी, वैद्यकीय सुविधा, निवृत्तीवेतन व इतर विविध मागण्यांबाबत दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार गृह विभाग, सामान्य प्रशासन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांना त्यांच्याशी संबंधीत मुद्यांसंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे कळविले असून क्रीडा विभागाशी संबंधित मुद्यांबाबत कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२८-०९-२०२२) : (१) व (२) होय

(३) महाराष्ट्रातील वयोवृध्द खेळाडू व किताब प्राप्त कुस्तीगिरांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्यातील सज्जा कार्यालयामधील तत्कालीन तलाठी यांच्या सातबारा ऑनलाईनच्या कामाबाबत

(११) ३५९९० (१४-१२-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्यातील सज्जा कार्यालयामधील तत्कालीन तलाठी यांनी सातबारा ऑनलाईनचे काम न करता पूर्ण झाल्याचे दाखविल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन काम करते वेळी विंडो उघडून सातबारा जुळविला होता परंतु १५५ खाली तहसीलदार यांची परवानगी घेऊन सातबारा जुळवावा लागत असुन सदर कार्यालयामधील तत्कालीन तलाठी यांनी ऑनलाईनचे काम न करता सातबारा न जुळविता फेर घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्त (महसूल) औरंगाबाद व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सन्मा. लोकप्रतिनिधी यांचे पत्रास अनुसरून उपायुक्त (महसूल) यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना तात्काळ कार्यवाहीबाबत सूचीत केले आहे. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांनी उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई व तहसलिदार, अंबाजोगाई यांना यासंदर्भात तात्काळ कार्यवाहीच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) अंबाजोगाई सजेमध्ये अंबाजोगाई, मोरेवाडी, जोगाईवाडी, शेपवाडी, मगरवाडी, दस्तगीरवाडी, काळवटीतांडा व कुरणवाडी या महसुली गावांचा समावेश होता. त्यामध्ये एकुण २६८६ इतके ७/१२ होते. सदर ७/१२ पैकी नागरीकांच्या तक्रारी असणा-या व शहर व लगतच्या प्लॉटींगच्या ३१५ इतक्या ७/१२ ची तपासणी केली असता त्यामध्ये हस्तलिखीत ७/१२ प्रमाणे ऑनलाईन ७/१२ मध्ये काही विसंगती आढळून आल्या आहेत. ऑनलाईन असलेली काही नावे चुकीचे असल्याचे दिसून आले. जे की हस्तलिखीत ७/१२ प्रमाणे नाहीत. ७/१२ चे एकुण क्षेत्र व खातेदारांचे एकुण क्षेत्र यामध्ये तफावत असणे, खातेदाराचे नावापुढे चुकीचे फेरफार क्रमांक नमुद केलेले असणे, एकाच फेरफार क्रमांकाने नावे घेणे, चुकीच्या फेरफार क्रमांकाने ७/१२ वरील नावाला कंस असणे अशा त्रुटी दिसून आल्या. त्यानुषंगाने सदर त्रुटी असलेले उपरोक्त ३१५ इतक्या ७/१२ पैकी ५१, ७/१२ म.ज.म. अधिनियम कलम १५५ अन्वये तहसिलदार मान्यतेने दुरुस्त करण्यात आले आहेत. उर्वरीत ७/१२ वरील क्षेत्र जुळविण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अंबाजोगाई ग्रामीण सजामधील मोरेवाडी, जोगाईवाडी, शेपवाडी, मगरवाडी, दस्तगीरवाडी, काळवटीतांडा, व कुरणवाडी या गावचे वाडीविभाजन करुन नविन महसूली गावे तयार करण्यात आली आहेत. तसेच नविन तलाठी सजा पुनर्रचनेनुसर अंबाजोगाई सजामधून मोरेवाडी, शेपवाडी, कुरणवाडी ही स्वतंत्र सजे निर्माण करण्यात आली आहेत. मुळ अंबाजोगाई सजा वगळता मोरेवाडी, शेपवाडी, कुरणवाडी या सजामधील कृषीक ७/१२ ऑनलाईन असून त्याबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त नाहीत

हवेली अप्पर तहसिल (ता.हवेली, जि. पुणे) कार्यालयाकरिता स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची नेमणुक करुन नवीन अप्पर तहसिल कार्यालय सुरु करण्याबाबत

(१२) ३६५९४ (१०-०१-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली अप्पर तहसिल (ता.हवेली, जि. पुणे) कार्यालयाकरिता स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक करुन

स्वतंत्र अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्याबाबत महसूल व वन विभागाकडून विभागीय आयुक्त, पुणे यांना पत्र निर्गमित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील ग.नं. १७७ मधील ४.३९ हे. आर क्षेत्र अप्पर तहसिल कार्यालय, हवेली यांना देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन अप्पर तहसिल कार्यालय निर्मितीसाठी मौजे कमदवाकवस्ती येथील जागा व स्वतंत्र अधिकारी, कर्मचारी देण्याबाबतच्या प्रस्तावावरील अधिसूचना प्रसिध्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-१०-२०२२) : (१), (२) व (३)
हवेली तालुक्याकरिता अपर तहसिल कार्यालय सुरू करण्याच्या प्रस्तावावर वित्त विभागाच्या सहमतीने व शासन मान्यतेने निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अपर जिल्हाधिकारी यांना भारतीय प्रशासन सेवेत समायोजित करण्याचे बनावट आदेश काढल्याबाबत

(१३) ३७९२३ (०७-०४-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), अॅड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपर जिल्हाधिकारी पदावर असणाऱ्या पाच अधिकाऱ्यांना भारतीय प्रशासन सेवेत समायोजित करण्याचे बनावट आदेश काढल्याप्रकरणी मुंबईतील मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आ ल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बनावट आदेशाचे पत्र तयार करुन ते सोशल मिडीयावर व्हायरल केल्यानंतर सदर प्रकार निदर्शनास आला असून सदर प्रकरणाबाबत शासनाचे अवर सचिव यांनी फिर्याद दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणावर चौकशी केली आहे काय, चौकशीअंती आरोपीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-१०-२०२२) : (१), (२), व (३) अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिका-यांना भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती देऊन त्यांना अन्य पदावर पदस्थापना देण्याबाबत नमूद करुन बोगस आदेश निर्गमित करण्यात आले असल्याची बाब दिनांक ०७.०१.२०२२ रोजी या विभागाच्या निदर्शनास आणण्यात आली होती. तथापि, सदर आदेश हे पुर्णपणे बोगस व खोटया स्वाक्षरीने काढण्यात आले असून अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही महसूल व वन विभागाकडून झालेली नाही. सदर बाब सामान्य प्रशासन विभाग व शासनाच्या निदर्शनास आणुन देण्यात आली आहे.

अशाप्रकारचे खोटे शासन आदेश निर्गमित झाल्यामुळे शासनाची प्रतिमा मलीन होत असल्याने व या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याच्या अनुषंगाने मरीन लाईन्स पोलीस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा क्रमांक २/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, ४६४, ४६५, ४६६ व ४६७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत गुन्हयामध्ये दोन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रामटेक (जि. नागपूर) येथील तलाठयाने विहीत मुदतीत फेरफाराची कार्यवाही पुर्ण केली नसल्याबाबत

(१४) ३८३३६ (०१-०४-२०२२). अॅड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि. नागपूर) येथील ललिता वासुदेव बंधाटे, रा. हमलापूरी यांनी मौजा- हातोडी येथील स.क्र. ९५ ही शेतजमीन खरेदी केली असून फेरफार करण्याकरिता अर्ज करून ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होवूनही फेरफार प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या मार्गदर्शक सूचना असतांनाही तलाठयाने विहीत मुदतीत शेतजमीनीच्या फेरफाराची कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ,चौकशीनुसार विहीत मुदतीत फेरफार न करणा-या तलाठयांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) : (१) होय,

मात्र, सदर फेरफार घेण्यासंदर्भात ऑनलाईन तांत्रिक अडचण उद्भवल्याने फेरफार प्रलंबित होता. तसेच सदर तांत्रिक अडचणींबाबत NIC नागपूर मार्फत हेल्पडेस्क NIC पुणे यांचेशी ई-मेलव्दारे पत्रव्यवहार करण्यात आला. तद्नंतर सदर फेरफार दि.१९/०१/२०२२ रोजी प्रमाणित करुन मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर फेरफार प्रलंबित नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर विलंब हा ऑनलाईन तांत्रिक अडचणीमुळे उद्भवलेला आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात छडवेल, दहीवेल, निजामपूर, जैताणे इत्यादी परिसरात सुझलॉन कंपनीने ग्रामस्थांची केलेली फसवणूक

(१५) ३९५४१ (०१-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छडवेल, दहीवेल, निजामपूर, जैताणे (ता. साक्री, जि.धुळे) येथील गावांच्या विकासासाठी निधी, नागरिकांना नोकरी तसेच टॉवर्स बांधण्यासाठी आवश्यक असलेली जमीन चांगल्या भावात विकत देण्याबाबतची खोटी आश्वासने सुझलॉन कंपनीने गावातील ग्रामस्थांना देऊन टॉवरची उभारणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॉवरला, ट्रान्सफॉर्मरच्या सुरक्षा व्यवस्थेकडे कंपनीच्या दुर्लक्षीतपणामुळे दिनांक १७ नोव्हेंबर,२०२० रोजी वा त्यासुमारास ८ वर्षाच्या एका मुलाचा ट्रान्सफॉर्मरच्या तारेला स्पर्श होऊन मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा खोटया आश्वासनामुळे ग्रामस्थांना करण्यात आलेल्या फसवणूकीबाबतच्या तक्रारी लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-१०-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

छडवेल, निजामपूर, जैताणे (ता.साक्री, जि. धुळे) येथे पवन ऊर्जा टॉवरची उभारणी केली आहे, हे खरे आहे. तथापि, सुझलॉन कंपनीने ग्रामस्थांना दिलेल्या खोट्या आश्वासनाबाबत तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) यासंदर्भात शासनाकडे तसेच धुळे जिल्हाधिकारी कार्यालयांकडे तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

यवतेश्वर, कास (ता.जि.सातारा) परिसरातील स्थानिक भूमिपुत्रांची बांधकामे अधिकृत करण्याबाबत

(१६) ३९६०४ (०७-०४-२०२२). श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (सातारा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतेश्वर, कास (ता.जि.सातारा) या परिसरात स्थानिक भूमिपुत्रांनी त्यांच्याच मालकीच्या जागेत छोटी हॉटेल बांधून व्यवसाय सुरु केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामे अनधिकृत ठरवून महसूल विभागाने संबंधित व्यावसायिकांवर गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निकषानुसार दंड आकारणी करून सदर बांधकामे अधिकृत करण्याची मागणी संबंधित व्यावसायिकांनी जिल्हाधिकारी,सातारा यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बांधकामे अधिकृत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-१०-२०२२) : (१),(२),(३),(४) व (५) सातारा ते कास या रस्त्यालगत अनधिकृत बांधकाम केलेल्या प्रकरणांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५४ खाली नोटीसा दिल्या आहेत.

यापैकी काही बांधकामधारकांनी न्यायालयात दावे दाखल केले होते. त्यामधील १० प्रकरणी बांधकामधारकांची मनाई हुकूम देण्याची मागणी न्यायालयाणे फेटाळली आहे. यामधील ११ अनधिकृत बांधकामधारकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

निकषानुसार दंड आकारणी करून सदर बांधकामे अधिकृत करण्याची मागणी संबंधित व्यावसायीकांनी जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे केली आहे.

सातारा-कास रस्त्यावरील अनधिकृत बांधकामे समुद्र सपाटीपासून १००० मीटर उंचीवर आहेत. समुद्र सपाटीपासून १००० मीटर उंचीवरील क्षेत्राच्या विकासाकरिताच्या नियमावलीची अधिसुचना शासन निर्णय नगर विकास विभाग दि. २३/१२/२०२१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

संबंधित अनधिकृत बांधकामधारकांनी सदर नियमावलीनुसार रेखांकन आराखडे तयार करुन नियोजन प्राधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी सादर केल्यास अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्याच्या अनुषंगाने वरिल नियमावलीतील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजीत आहे.

राज्यातील ग्रामपंचायतींना गायरान जागा विविध विकास कामांच्या प्रयोजनासाठी मिळण्याबाबत

(१७) ४००७१ (०७-०४-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतींकडून आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना, बाजारतळ, ग्रामपंचायत इमारत, पाणीपुरवठा योजना, क्रीडांगण, अंगणवाडी इमारत इत्यादी कामांसाठी गायरान जागा मागणी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गायरान जागा मागणी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेला असता मंजूर केलेल्या इमारतीसाठी अथवा कामासाठी प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रशासकीय मान्यता न मागता जागा मागणी प्रस्ताव मंजूर करणे अपेक्षित आहे जेणेकरुन गावात विकासकामे होऊन अतिक्रमणे होणार नाहीत याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-१०-२०२२) : (१) होय, अशा प्रकारचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त होत असतात.
(२) मागणी केलेल्या जागेचे प्रयोजन तसेच प्रशासकीय मान्यता इत्यादी बाबींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात प्रस्तावाची छानननी केली जाते.
(३) सार्वजनिक प्रयोजनासाठी राखीव जागांचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. तथापि, आरक्षित नसलेली परंतु सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेली शासकीय गायरान जमीन मंजूर करण्याचे अधिकार शासनास असल्याने असे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे मंजूरीसाठी पाठविले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ८५ उपजिल्हाधिकारी यांच्या बढती बाबत..

(१८) ४०१८९ (११-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००२ या कालावधीमध्ये थेट उपजिल्हाधिकारी म्हणून भरती झालेल्या अधिका-यांना अदयाप एकही बढती मिळालेली नसल्याने २० वर्षापासून ते एकाच पदावर कार्यरत असून ८५ उपजिल्हाधिकारी अप्पर जिल्हाधिकारी होण्याच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी.२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपजिल्हाअधिकारी यांची बढती न होण्याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित उपजिल्हाधिकारी यांच्या बढती संदर्भात निर्णय घेणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-१०-२०२२) : (१) व (२) सन २००२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने भरती झालेले उप जिल्हाधिकारी तसेच, पदोन्नती कोटयातून पदोन्नत झालेले उप जिल्हाधिकारी यांना सेवाज्येष्ठतेनुसार व सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या पदाची वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिका-यांची
दि. ०१.०१.१९९९ ते दि. ३१.१२.२००३ या कालावधीची व दि. ३१.१२.२०२० च्या अंतिम ज्येष्ठतासूचीस आव्हानित करुन महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे T.A. १/२०२१ आणि T.A. २/२०२१ दाखल करण्यात आले आहेत.

सदर ज्येष्ठतासूचीसंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे देखील मुळ अर्ज २३६/२०२१ व २३७/२०२१ अन्वये आव्हानित करण्यात असून दि. २७.०७.२०२१ रोजी अर्जदाराची अंतरिम स्थगिती (Interim Relief) देण्याची विनंती न्यायालयाने नाकारली आहे.

महसूल संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने या विभागाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठ येथे संकीर्ण अर्ज क्र. ३०५.२०२१ दाखल केला होता. सदर याचिकांमध्ये मा. न्यायाधिकरणाने दि. १७.१२.२०२१ रोजी दिलेल्या स्थगिती आदेशामध्ये सुधारणा करुन अपर जिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यास परवानगी दिली आहे. त्यास अनुलक्षून, उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील पात्र
अधिका-यांना अपर जिल्हाधिकारी या पदावर शासन आदेश, दि. १८.०८.२०२२ अन्वये, पदोन्नती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे डिस्कळ (ता.खटाव, जि.सातारा) गावाचा गट नकाशा, विस्तार पत्रकात (उप अधिक्षक भूमि अभिलेखात) चालु गट क्रं.१३५५ च्या सर्व गटांच्या नोंदी नसल्याबाबत

(१९) ४०४६९ (०१-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डिस्कळ (ता.खटाव, जि.सातारा) येथील गावाचा गट नकाशा, विस्तार पत्रकात गट क्र.१३५५ च्या पुढील सर्व गटाच्या नोंदी (भुमी अभिलेखात) नसल्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील नागरिकांनी उप अधिक्षक भूमी अभिलेख, खटाव मु.वडूज व मा.उपसंचालक यांच्याकडे मागणी करून तसेच आवश्यक कागदपत्रे सादर करून सुद्धा कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे शेतकऱ्यामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे गट नोंदी होण्यास विलंब होत असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून येथील गटांच्या नोंदणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) मौजे डिस्कळ, ता. खटाव, जि. सातारा येथील ग.नं. १३५५ ते १३५९ या गटामध्ये जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचेकडील दिनांक १६.७.१९८० च्या आदेशान्वये मंजूर दुरूस्ती योजनेच्या अनुषंगाने अनुसरण काम (नकाशा व आकारबंद यात नोंदी अद्यावत करणे) दिनांक १०.२.२०२१ रोजी पुर्ण करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यात क्रीडा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

(२०) ४०७७७ (०७-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात खेळासाठीचे पोषक वातावरण, सरकारचा पाठींबा व आर्थिक प्रश्न या गोष्टींच्या अभावामुळे आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होत नसल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनामुळे क्रीडा क्षेत्रावर लादण्यात आलेल्या बंधनामुळे आधीच खेळाडू दोन वर्षे मागे गेल्याने क्रीडा धोरण प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) व (३)

राज्यात क्रीडा धोरण, २०१२ ची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

माळशिरस (जि.सोलापूर) येथे सुज्ज क्रीडा संकुल उभारण्याबाबत

(२१) ४०८३० (०७-०४-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) येथे सर्व सोयी सुविधा युक्त सुज्ज क्रीडा संकुल उभारण्याची मागणी नागरिकांमधून होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत क्रीडा संकुल उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२२) : (१) व (२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक २६.०३.२००३ व शासन निर्णय दि. २३.०३.२०२२ नुसार एका तालुक्यात एक याप्रमाणे तालुका क्रीडा संकुल उभारण्याची तरतुद आहे. त्यानुसार माळशिरस तालुक्याचे क्रीडा संकुल अकलुज ता. माळशिरस येथे उभारण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अप्पर कोकण आयुक्त, मुंबई यांच्या दालनात आरटीएस रिव्हीजन प्रमाणे मौजे लाखिवली गावातील जमिनीची लागवड करीत असल्यामुळे तालुका टेनेन्सी हुकूम आदेशात फेरफार असल्याबाबत

(२२) ४०८९० (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री. कैलास गोरंट्याल (जालना) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर कोकण आयुक्त, मुंबई यांच्या दालनात आरटीएस रिव्हीजन क्र.६६७/२०१८ प्रमाणे मौजे लाखिवली गावातील सर्व्हे क्र.१२१/२,१५२/२ ची जमिन बाळकृष्ण नारायण पाटील हे लागवड करीत असल्यामुळे तालुका टेनेन्सी हुकूम दिनांक १५/९/५४ च्या आदेशाने फेरफार क्र.२४२ पडला होता, त्यानंतर बाळकृष्ण नारायण पाटील हे सन १९७९ साली मृत पावल्याने फेरफार क्र.५४९ ने त्यांचे वारस लागले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या दोन फेरफारांच्या विरुध्द प्रतिवादी यांनी ५६ वर्षाच्या विलंबानंतर अपिल केले, ते फेटाळण्यात न आल्याने तसेच प्रतिवादी मनिषा गोपाळ शिंगे हिने चुकीचे दावे दाखल करुन न्यायालयाची दिशाभूल केल्याने अपिलार्थी यांचे टेनेन्सी हुकूम होऊन १९५४ साली फेरफार झाला, तर प्रतिवादी यांनी ५६ वर्षानंतर टेनेन्सी ॲक्टखाली दावा दाखल करण्याऐवजी आरटीएस दावा दाखल करुन अपिलार्थी यांना नाहक त्रास दिलेला आहे व वेळोवेळी उपविभागीय अधिकारी भिवंडी, अप्पर जिल्हाधिकारी ठाणे व अप्पर कोकण आयुक्त,मुंबई यांच्या निदर्शनास आणूनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रतिवादी मनिषा शिंगे यांच्या बाजूने चुकीचे निर्णय लागलेले आहे, कारण अपिलार्थी अनंता पाटील यांच्या मूळ टेनेन्सी हुकूमाच्याविरुध्द एकही दावा न झाल्याने त्यांचे कुळ कायदयाचे अधिकारी ७० ब प्रमाणे व ३२ ग प्रमाणे अधिकार अबाधित आहेत, सदर जमिन मिळकत ही देवस्थान दाखवत असले तरी सहा.धर्मादाय आयुक्त ठाणे यांना सदर जमिन ही देवस्थान नसल्याचे अप्पर कोकण आयुक्त यांना पत्र दिलेले आहे, त्यामुळे अपिलार्थी अनंता पाटील यांना कुळ कायद्याने प्राप्त झालेली जमिनीच्या विरुध्द चुकीच्या दिशेने प्रतिवादी यांनी अपिल दाखल करुन न्यायालयाची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा सदर प्रकरणामध्ये आतापर्यंत अपिलार्थी ज्येष्ठ नागरिक यांना विनाकारण कायदयाच्या ध्येय धोरणांची दिशाभूल करुन विलंबनाचा मुद्दा डावलून विनाकारण गेली १५ वर्ष जेष्ठ नागरिक अपिलार्थी हे आजाराने असल्याने त्यांना कायदेशीर न्याय मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय,

(५) असल्यास, संबधित विभागाला शासनाने जेष्ठ नागरिकांच्या समस्या ऐकून शासनाने न्यायनिवाडा करण्यासाठी दाव्यांचे कार्यकाळ ठरवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-१०-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही
(४) व (५) नियमातील तरतूदी नुसार अशी प्रकरणे अर्धन्यायीक स्वरुपाची असून त्यांची सुनावणी घेऊन गुणवत्तेनुसार निकाली काढण्यात येतात.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील नगर भूमापन (सिटी सव्हे) ८०९ गावात झाले नसल्याबाबत

(२३) ४१७२६ (०६-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील नगर भूमापन (सिटी सर्व्हे) अद्याप झाले नाही अशी तब्बल ८०९ गावे असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या गावातील नागरिकांच्या जमिनीसंदर्भातील अडचणी वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गावांचा सिटी सर्व्हे अद्यापपर्यंत न होण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-१०-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) कोल्हापूर जिल्हयांमध्ये १२ तालुक्यामध्ये एकूण १२३१ गावांपैकी पारंपारिक पध्दतीने ४२२ गावांचे नगर भूमापन पूर्ण झाले असून ८०९ गावांचे नगर भूमापन होण्यावर शिल्लक आहे. केंद्र शासनाच्या स्वमित्व योजनेअंतर्गत ग्रामविकास विभागाकडील दिनांक २२.२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील नगर भूमपन न झालेल्या सर्व गावाचे गावठाणातील मिळकतींचे नगर भूमापन करण्याबाबतचा गांवठाण जमाबंदी प्रकल्प राज्यात लागू करण्यात आला आहे. त्यानुसार कोल्हापूर १२ तालुक्यातील गांवठाण भूमापन होण्यावर प्रलंबित ८०९ गावांपैकी ३१६ गावांची ड्रोनव्दारे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून त्यापैकी १२५ गावांच्या मिळकत पत्रिका व नकाशा तयार झाले आहेत. उर्वरित ४९३ गावाचे काम कर्मचारी उपलब्धता, सर्वे ऑफ इंडीयाकडील ड्रोन उपलब्धता, नैसर्गीक आपत्ती लक्षात घेऊन त्यानुसार पुढील २ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जमिनीच्या मालकी हक्काबाबत रुढ असलेली दुहेरी नोंदणी पध्दत
बंद करुन शासनाने एकेरी नोंदणी पध्दत सुरु केल्याबाबत

(२४) ४१८७५ (०५-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जमिनीच्या मालकी हक्काबाबत रुढ असलेली दुहेरी नोंदणी पध्दत बंद करुन शासनाने एकेरी नोंदणी पध्दत सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगर भूमापन नोंदणी अद्यावत नसल्यामुळे दस्ताऐवज करण्याची अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,जमिनीच्या दस्तावेज करण्याची यापूर्वी नगर भूमापन आणि महसूल अशा दोन दुहेरी नोंदणी व्यवस्था कार्यरत असतांना एकेरी नोंदणी पध्दत सुरु करण्याची कारणे काय आहेत व ही पध्दत पारदर्शक व भूखंड मालकांना त्रासदायक ठरु नये याकरीता दस्तावेज करण्याची कामे होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

काही अपवादात्मक प्रकरणांमध्ये अधिकार अभिलेख (मालमत्ता पत्रक) अद्यावत होणेस प्रलंबित असल्यास ऑनलाईन ई-फेरफार करणेस पर्यायाने दस्ताची नोंदणी करण्यास अडचण निर्माण होते. अशा वेळेस skip पर्याय वापरून दस्त नोंदणी करण्यात येते.

(३) दुहेरी नोंद सूरू असल्याने मालकी हक्काबाबत संभ्रम निर्माण होतो. तसेच वादविवाद निर्माण होतात. एकेरी नोंद पध्दत पारदर्शक व भूखंडमालकांना त्रासदायक ठरू नये याकरीता नोंदणी विभागाकडील i-SARITA व नगर भूमापन विभागाकडील e-PCIS या आज्ञावलींची जोडणी करून खरेदी विक्रीच्या नोंदी ऑटो ट्रिगर म्युटेशनव्दारे मिळतपत्रिकेवर दाखल करणेची योजना कार्यान्वीत केली आहे. त्यामुळे मिळकतीबाबतच्या व्यवहारांची नोंद अधिकार अभिलेखात अद्यावत करण्यासाठी जनतेस कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील एकत्रीकरण योजनेतील क्षेत्रानुसार नकाशा दुरुस्ती करणेबाबत

(२५) ४२३२० (०७-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात एकत्रीकरण योजनेतील क्षेत्रानुसार नकाशा दुरुस्तीचे अनेक प्रकरण उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय नागपुर यांच्याकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील एकत्रीकरण योजनेतील क्षेत्रानुसार नकाशा दुरुस्ती करण्यासंदर्भात संचालक भूमी अभिलेख कार्यालय पुणे व उपसंचालक भूमी अभिलेख नागपुर यांना दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी वा शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-१०-२०२२) : (१) हे खरे आहे.
चंद्रपूर जिल्हयातील एकत्रिकरण योजनेतील ८ प्रकरणे उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर यांचेकडे कार्यवाहीवर शिल्लक आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) चंद्रपूर जिल्हयातील एकत्रिकरण योजनेतील प्रलंबित प्रकरणे कालबध्द कार्यक्रम आखून ३ महिन्यात निकाली काढण्यात येत आहेत.

जळगाव जिल्हयात दूध संघ मर्यादित BMC सेंटर हे शेती पूरक व्यवसायात समाविष्ट करणेबाबत

(२६) ४२४९० (०७-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात दूध संघ मर्यादित व जळगाव आणि राष्ट्रीय दुग्ध योजना अंतर्गत जिल्ह्यात २० ते २२ BMC सेंटर सुरू आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील सेंटर शेती पूरक व्यवसायात समाविष्ट करण्यात आले असता, त्यामुळे शेतकऱ्यांना वीज बिलात ५०% सूट मिळणार असल्यामुळे दूध उत्पादक सहकारी सोसायट्यांना त्यांचा भरपूर फायदा होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. जळगांव जिल्ह्यात सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., जळगांव व राष्ट्रीय दुग्ध योजनेतंर्गत जिल्ह्यात २० BMC सेंटर सुरू आहेत.
(२) व (३) हे खरे आहे. विद्युत अधिनियम,२००३ मधील तरतूदीनुसार मा. आयोगाच्या आदेशाचे पालन करणे महावितरण कंपनीला बंधनकारक आहे. तथापि, महाराष्ट्र विद्युत आयोगाने दुध शितकरण केंद्राचा (Milk Processing/Chilling Plants (Dairy)) शेती पुरक व्यवसायात न केल्याने औद्योगिक दराने वीज आकारणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्हयातील सर्व शेतक-यांच्या शेत जमिनी ७/१२ प्रमाणे शासनामार्फत शासकीय मोजणी करुन व मोजणीस मंजूरी देणेबाबत

(२७) ४२४९२ (०७-०४-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शेतीची तुकडेबंदी केलेली आहे व ८५/२ प्रमाणे मोजणीचा निर्णय शासनाने रद्द केलेला असल्यामुळे शासकीय मोजणी करणे अवघड झाले आहे व त्यासाठी खूप मोठा कालावधी लागत असल्याने शेतक-यांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी जिल्हयातील सर्व शेतकऱ्याच्या शेत जमिनी ७/१२ प्रमाणे शासनामार्फत शासकीय मोजणी करुन व मोजणीस मंजूरी देणेबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
महाराष्ट्र धारण जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ सद्यस्थितीत लागू आहे. त्यानुसार निर्धारित प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा तुकडा करता येत नाही. सदर कायदयान्वये ठरविण्यात आलेल्या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा हिस्सा होत असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ८५/२ अन्वये पोटहिस्सा मोजणी करता येत नाही.
(३) प्रमाणभूत क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सद्यस्थितीत मोजणी प्रकारानुसार विहीत करण्यात आलेले आवश्यक शुल्क भरणा करून मोजणी करून देण्यात येत आहे. त्याचबरोबर विविध आधुनिक तंत्रज्ञान जसे की, CORs Rovers, ETS Machines, इ. चा वापर करून मोजणी कामास गती देण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या शेतजमीनीची शासनामार्फत मोजणी करण्याची कोणतीही तरतुद नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चोपडा (जि.जळगांव) क्रीडा संकुलाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२८) ४२५२१ (११-०४-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगांव) क्रीडा संकुलाकरीता शासनाने एक कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन दिला असून बांधकामाचे वाढते दर लक्षात घेता क्रीडा संकुलाकरीता पाच कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने वाढीव निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सदर क्रीडा संकुलाच्या रु. ५२६.१० लक्षच्या अंदाजपत्रकास राज्य क्रीडा विकास समितीच्या दि. २३.०३.२०२२ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई, येथील तहसीलदार यांनी बेकायदेशीर कामे करण्यासाठी तलाठी यांना अतिरिक्त पदभार देऊन नागरिकांची आर्थिक पिळवणूक केल्याबाबत

(२९) ४२६४४ (१२-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील तलाठी कार्यालयाअंतर्गत शहर व शहरालगतच्या बारा वाड्या येतात तसेच एवढा मोठा सजा असतानाही तहसीलदार यांनी वादग्रस्त तलाठी युवराज सोळंके यांना सदर सज्जाचा अतिरिक्त पदभार दिला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त कार्यालयात अनधिकृतपणे रायटर श्री, प्रशांत, श्री, साहेबराव, श्री, जुनेद, हे कामकाज करत आहेत. व इतर तीन ते चार एजंट/दलाल, कोणालाही न घाबरता तलाठ्यासमोर संगणक हताळतात सर्व शासकीय अभिलेख या खाजगी अनधिकृत लोकांच्या हातात आहेत.त्यामुळे ते जनतेची आर्थिक पिळवणूक करतात. याबाबत पुराव्यासह व्हिडीओ क्लिप उपजिल्हाधिकारी व तहसीलदार, अंबाजोगाई यांना दिल्या आहेत हे ही खरे आहे काय,
(३) तलाठी कार्यालय व मंडळ अधिकारी कार्यालय हे तहसील कार्यालयाच्या परिसरात आहे. सदर प्रश्नी तहसीलदार, अंबाजोगाई. यांच्याकडे अनधिकृत रायटर यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सतत पाठपुरावा व पत्र व्यवहार करत आहेत मात्र याबाबत पुराव्यासह व्हिडीओ क्लिप त्यांना देऊनही कार्यवाही करण्यात येत नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास या बाबत मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री यांच्याकडे दि. ०८/०१/२०२२, दि. १४/०१/२०२२, दि. २२/०१/२०२२, दि. २४/०१/२२, दि. २५/०१/२०२२, दि. ३१/०१/२०२२ व दि. ०४/०२/२०२२ रोजी वां त्यासुमारास सातत्याने निवेदनाद्वारे व्हिडीओ पुराव्यासह केली आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून अंबाजोगाई, तलाठी कार्यालयातील अनधिकृत रायटर त्यांना नियुक्त करणाऱ्या तलाठी व तहसीलदार यांच्यावर कोणती कार्यवाही केली वां करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) : (१) दि.२९/१२/२०२१ ते दि/२०/०२/२०२२ या कालावधीत तलाठी सजा अंबाजोगाईचे नियमित तलाठी रजेवर असल्याने प्रशासकीय कारणास्तव सदर कालावधीत उक्त तलाठी सजाचा अतिरिक्त कार्यभार श्री.युवराज सोळंके यांना देण्यात आला, हे खरे आहे.
(२) होय.
(३) नाही.
(४) मा.लोकप्रतिनिधींकडून शासनास सदर निवेदने प्राप्त झालेली आहेत, हे खरे आहे.
(५) व (६) मा.लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.२१/०१/२०२२, दि.२४/०१/२०२२ व २७/०१/२०२२ अन्वये संबंधित तलाठी श्री. युवराज सोळंके यांना “कारणे दाखवा” नोटीस बजावून खुलासा मागविला असून पुढील कार्यवाही चालू आहे.

तसेच शासनास प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, चौकशी करुन नियमोचित कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

रेशीम उद्योग योजना कृषी विभागामार्फत राबविण्याबाबत

(३०) ४२९४२ (१३-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेशीम विभागाकडे अत्यल्प मनुष्यबळ असल्याने कमी पाण्यावर शेतकऱ्यांना वर्षभर शाश्वत उत्पादन देणारी शेतकऱ्याला जोडधंदा म्हणून फायदेशीर असलेली तुती लागवड व रेशीम कोश उत्पादन ही मनरेगा अंतर्गतची योजना सक्षम राबवली जात नसल्याने सदरील योजना कृषी विभागामार्फत राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ११ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना रेशीम विभाग कृषी विभागास वर्ग करण्याबाबत आयुक्त रेशीम विभाग, नागपूर यांनी सचिव, महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, मंत्रालय यांच्याकडे सन २०२१ या कालावधीत प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, अत्यंत महत्त्वाची योजना कृषी विभागामार्फत राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२२-०८-२०२२) : (१) हे खरे नाही.

तुती लागवड व रेशीम कोष उत्पादन योजना ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राबविण्यात येते. सदर योजना ही कृषि विभागामार्फत राबविण्यासंदर्भातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे कोणतेही निवेदन अथवा मागणी वस्त्रोद्योग विभागास प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) रेशीम विस्तार व विकासासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, केंद्र पुरस्कृत योजना तसेच, कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्प (पोकरा), राष्ट्रीय कृषि विकास योजना, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन योजना (आत्मा) या योजनांमधून रेशीम शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत आहेत. कृषि विभागाकडे आयुक्तालयापासून गाव पातळीपर्यंत यंत्रणा असून मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आहे, कृषि विद्यापीठांचा रेशीम शेती व उद्योगासाठी संशोधन व विस्तारासाठी व कृषि विभागाकडील वनामती, रामेती या प्रशिक्षण केंद्राचा अधिकारी/कर्मचारी आणि शेतकरी यांना रेशीम उद्योगाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रभावीपणे उपयोग करता येईल तसेच, कृषि विभागाच्या इतर योजनांचादेखील फायदा रेशीम शेतकऱ्याना मिळेल, याकरिता रेशीमशी संबंधित कामकाज कृषि विभागात विलीन करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक (रेशीम) यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने याबाबत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री, कृषि यांचेसमवेत संयुक्त बैठक घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सह दुय्यम निबंधक वर्ग - २ कार्यालय, अंबाजोगाई येथे नवीन इमारतीचे बांधकाम करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(३१) ४३१४८ (०७-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (ता.अंबाजोगाई जि.बीड) येथे सह दुय्यम निबंधक वर्ग -२ कार्यालय सद्यस्थितीत भाड्याच्या जागेवर कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा ही अत्यंत अपुरी व गैरसोयीची असल्याने या कार्यालयात सर्व सामान्य जनतेच्या दैनिक व्यवहाराच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीचे आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य दरसूची २०१९-२० नुसार उपरोक्त कामाचे रु. २०८.८० लक्ष एवढ्या रकमेचे सुधारित अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई यांनी तयार करून दिनांक ५ सप्टेंबर,२०१९ रोजी वा त्यासुमारास मा.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विकास मंडळ उस्मानाबाद कार्यालयाच्या तांत्रिक बाबी तपासणे व साक्षांकीत करुन . सह जिल्हानिबंधक निवड श्रेणी वर्ग -१ बीड कार्यालयाकडे प्रशासकीय मान्यतेच्या पुढील कार्यवाहीसाठी सादर केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री यांना दिंनांक १० ऑगस्ट,२०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती ,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नवीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२३-०८-२०२२) : (१) हे खरे नाही.

दुय्यम निबंधक (श्रेणी-१) केज हे कार्यालय केज (ता.केज, जि. बीड) येथे स्वतंत्र शासकीय जागेवरील इमारतीत कार्यरत आहे.

(२) हे खरे नाही.

दुय्यम निबंधक, केज हे कार्यालय केज तालुक्यातील स्वतंत्र नविन शासकीय इमारतीत कार्यरत आहे. नविन बांधकाम असल्यामुळे विहित मानकानुसार जागा असून उक्त जागेत सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

परंतु श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांचे, केज मतदार संघातील ता.अंबाजोगाई, जि.बीड येथे सह दुय्यम निबंधक वर्ग-२ च्या नवीन इमारत बांधकामासाठी मंजूरी देवून निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे मा.मंत्री (महसुल) यांना लिहिलेले दि. १०.०८.२०२० रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(५) व (६) दुय्यम निबंधक, केज हे कार्यालय स्वतंत्र शासकीय इमारतीत कार्यरत असल्यामुळे नविन इमारत बांधकाचा प्रश्न उद्भवत नाही.

सिरसाळा व परळी (ता. परळी, जि. बीड) येथे श्री. युवराज सोळंके तलाठी म्हणून कार्यरत असल्याबाबत

(३२) ४३३१६ (२९-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसाळा व परळी (ता. परळी, जि. बीड) येथे श्री. युवराज सोळंके तलाठी म्हणून कार्यरत होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंदू एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या मिळकतीची वाटणी होऊन सहधारकास मिळकत प्राप्त होणे ही प्रक्रिया हस्तांतरण या नावाखाली येत नाही, म्हणून अशा वाटणीपत्राची नोंदणी करणे सक्तीचे नाही, तथापि अशा प्रकरच्या वाटणीपत्रावर महराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-१ मधील अनुछेद-४६ प्रमाणे मुद्रांक शुल्क देय आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठी श्री, युवराज सोळंके ज्या ज्या ठिकाणी सेवेत होते त्या ठिकाणी वाटणी पत्रकाच्या नोंदी बॉडवर करून नोंदी घेतल्या आहेत. सिरसाळा व परळी या ठिकाणी असतानाही वाटणीपत्रकाच्या नोंदी बॉडवर घेतल्या आहेत.सदर नोंदी घेताना शासनाचा मुद्रांक शुल्क भरून घेतला नाही. त्यामुळे शासनाचे मोठ्याप्रमाणत आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तलाठी यांच्या सेवा काळातील नोंदीची चौकशी करून शासनाचा मुद्रांक शुल्क संगनमताने भरून घेतला नाही तो सर्व मुद्रांक शुल्क त्यांच्याकडून वसूल करून त्यांच्यावर तातडीने कार्यवाही करण्याबाबत महसूल मंत्री व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक५ जानेवारी,२०२२ रोजी निवेदनाद्वारे व दिनांक ४ फेब्रुवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास स्मरणपत्र देऊन मागणी केली होती हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तलाठी श्री. सोळंके यांच्यावर कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) :(१) संबंधित तलाठी परळी येथे दि.१२/०३/२०२१ ते दि.०२/०७/२०२१ तसेच सिरसाळा येथे दि.३०/०६/२०२० ते दि.०२/०७/२०२१ या कालावधीत कार्यरत होते.
(२) होय.
(३) संबंधित तलाठी यांनी सिरसाळा येथे ३६ व परळी येथे ७ अशा एकूण-४३ नोंदी वाटणीपत्रकानुसार बाँडपेपरच्या आधारे घेऊन फेरफाराच्या नोंदी घेतल्या आहेत. सदर नोंदी घेतांना शासनाचा मुद्रांक शुल्क भरुन घेतले नसल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(४) होय.
(५) शासनास प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, चौकशी करुन नियमोचित कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सदर प्रकरणात तहसिलदार, परळी यांनी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांना "कारणे दाखवा" नोटीस दिलेल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, परळी वैजनाथ यांना तहसिलदार, परळी वैजनाथ यांच्या अहवालान्वये चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अंबाजोगाई जिल्हा निर्मितीबाबत.

(३३) ४३४५७ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गत अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुका हा जिल्हा करावा अशी मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, याबाबत अनेक आंदोलने, उपोषणे झाली असून बीड व अंबाजोगाई मधील अंतर ९५ कि.मी. असल्यालमुळे अंबाजोगाई सहित आजूबाजूच्या तालुक्यातील लोकांना जिल्हायाच्या ठिकाणी येऊन काम करणे कठीण जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉ. विमलताई मुंदडा यांनी जिल्हयासाठी लागणारी कार्यालये जसे की, अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधिक्षक कार्यालय, परिवहन कार्यालय, भुमीसंपादन कार्यालय अशी महत्वाची कार्यालये उक्त काळामध्ये मंजुर करुन सुरु केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंबाजोगाई जिल्हानिर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-१०-२०२२) : (१),(२),(३) व (४) होय
राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणते निकष विचारात घ्यावे, याबाबत अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने जिल्हा विभाजन/निर्मिती संदर्भात अहवाल शासनास सादर केला आहे.
जिल्हा निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून अत्यंत क्लिष्ट व खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

माणगांव-श्रीवर्धन (जि.रायगड) येथील मार्गावर घोणसे गावात खासगी बस दरीत कोसळून झालेला भीषण अपघात

(३४) ४४५८२ (२८-०६-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव-श्रीवर्धन (जि.रायगड) येथील मार्गावर घोणसे गावात खासगी बस दरीत कोसळून भीषण अपघात होऊन तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू होवून ३९ प्रवासी दिनांक ०८ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास गंभररित्या जखमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अपघातास जबाबदार असणाऱ्या बस चालकाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे काय,
(३), असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उपरोक्त अपघातात मृत पावलेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांना व जखमी झालेल्या प्रवाशांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सदर दुघटनेच्या अनुषंगाने म्हसळा पोलीस ठाणे येथे अपघात गुन्हा रजि.नं.४७/२०२२ भा.दं.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १४६/१९६, ३९/५६/१९२(१) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपी चालक देवेंद्र चंद्रकांत भाईप यास अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यास जामीनावर मुक्त केले आहे.
(३) सदर अपघाताची चौकशी करण्यात आली असून आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच अपघातात मृत पावलेल्या व जखमी प्रवाशांच्या नातेवाईकांना मदत मिळणेकरिता अपघात मोटार दावा प्राधिकरण, माणगाव, जि.रायगड यांना दि.३१.०५.२०२२ रोजी सविस्तर अपघात अहवाल पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील खांदा कॉलनी व कामोठे वसाहतीत बेकायदेशिररित्या पार्किंग होत असल्याबाबत

(३५) ४४६८९ (२९-०६-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) पोलीस वाहतूक विभागातील अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येमुळे सायन-पनवेल महामार्ग, द्रुतगती महामार्ग व मुंब्रा-पनवेल महामार्गातील सर्वाधिक वाहतूक वर्दळीच्या भागातील वाहतूकीचे नियोजन करण्यात अनेक अडचणी निर्माण होत असल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच कळंबोली, खांदा कॉलनी व कामोठे वसाहतीत बेकायदेशीररित्या पार्किंग केलेल्या अवजड वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचेही माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहतूक शाखेत मोठ्या प्रमाणात असलेल्या रिक्त पदांमुळे महामार्गावरील वाहतूकीचे नियंत्रण करणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच या ठिकाणी वाहतूक कोंडी दूर होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) : (१) कळंबोली वाहतूक शाखेकडे अधिकारी ०४ व ४१ पोलीस अंमलदार असे मनुष्यबळ कार्यरत असून कळंबोली भागात आाशिया खंडातील सर्वात मोठे स्टील मार्केट असल्याने तसेच आजूबाजूचे परिसरात नागरी वस्तीत झालेली वाढ, तसेच सायन पनवेल महामार्गावरील पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते.

(२) कळंबोली, खांदा कॉलनी, कामोठे वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे तसेच सदर वसाहतीच्या बाजूस एमआयडीसी व स्टील मार्केट असल्याने काही वाहन चालक हे त्यांची वाहने राहत्या घराजवळ रस्त्यावर पार्क करतात. अशा प्रकारच्या वाहनांवर वाहतूक शाखेकडून नियमितपणे कारवाई सुरू असल्याने अवजड वाहने पार्किंगचे प्रमाण कमी झालेले आहे.

(३) उपलब्ध मनुष्यबळातून वाहतूकीचे योग्य प्रकारे नियमन करण्यात येते.

(४) वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येते. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून सन २०२२ मध्ये नो-पार्किंगच्या ६६,६६५ केसेस व भा.दं.वि. क.२७९ नुसार ३०२ वाहनांवर १०९ केसेस केलेल्या आहेत.

पोलीस उपआयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांनी दि.०६.०७.२०२१ पत्रान्वये मुख्य अभियंता, सा.बां.वि., मुंबई यांना तसेच दि.०६.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना कळंबोली येथील रस्ता रुंदीकरण करण्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे, कोथरूड येथील सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पात विकासकाने अनधिकृत ब्रास गौणखनिज उत्खनन केले असल्याबाबत

(३६) ४४७१५ (२८-०६-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथरूड (जि. पुणे) येथील सर्व्हे नं.१०३ अ/१, १०३अ/२ आणि सिटी सर्व्हे नं.६७३ व ६७५ मध्ये सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पात विकासकाने १९६८ ब्रास अनधिकृत गौणखनिज उत्खनन केले असल्याचे माहे एप्रिल व मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तहसील कार्यालयाने संबंधित विकासक कोटीभास्कर इन्फ्रास्ट्रक्चरला नोटीस पाठविली असून पुढे कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पात जुन्या इमारतीचा पुनर्विकास करताना या कामासाठी गौणखनिज उत्खननाची मुदत संपली असताना देखील उत्खनन सुरु राहिल्याने तेथील तलाठी यांनी केलेल्या पंचनाम्यात अनधिकृत उत्खनन झाल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :(१),(२),(३),(४) व (५) मौजे कोथरूड, ता.हवेली जि.पुणे येथील स.न.१०३अ/१, स.न.१०३अ/२, सि.स.नं.६७३ व सि.स.नं. ६७५ येथील स्थळ पाहणी करून सदर क्षेत्रात १९६८ ब्रास अनाधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याबाबत तलाठी, कोथरूड यांनी त्याचा पंचनामा करून तहसिलदार हवेली यांना अहवाल सादर केला. या पंचानामाच्या अनुषंगाने तहसिलदार, हवेली यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८ (७) अन्वये संबंधीत विकसनकर्ते यांना दिलेल्या नोटीसाच्या अनुषंगाने विकसनकर्ते यांनी सादर केलेला युक्तीवाद, पुरावे व सदर क्षेत्रासाठी देण्यात आलेला गौणखनिज उत्खनन व वाहतुकीच्या तात्पुरत्या परवाना विचारात घेवून विकसनकर्ते यांनी सदर क्षेत्रातून ७० ब्रास अनाधिकृत पणे गौणखनिजाचे उत्खनन झाल्याचे आढळून आले. तहसिलदार हवेली यांच्या दिनांक २४.०५.२०२२ च्या आदेशान्वये ७० ब्रास अनाधिकृत गौणखनिज उत्खनापोटी विकसनकर्ते यांच्याकडून रू.३,०९,८९०/- इताक दंड करून वसूल करण्यात आला आहे.

राज्यात तुकडाबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायद्याचे उल्लंघन करुन तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांचे बनावट 'नाहकरत प्रमाणपत्र' घेऊन मालमत्तांची दस्त नोंदणी केल्याबाबत

(३७) ४४७२४ (२८-०६-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तुकडाबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायद्यांचे उल्लंघन करुन तसेच सक्षम प्राधिका-यांचे बनावट ना-हरकत प्रमाणपत्रांच्या आधारे हजारो मालमत्तांची बोगस दस्तनोंदणी करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, खरे आहे काय,

(२) असल्यास, दस्तनोंदणीच्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहारा प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अशाप्रकारे झालेल्या बोगस दस्तनोंदणी मधील दुरुस्ती तसेच अशा गैरव्यवहारांना कायमचा आळा घालण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे

तुकडाबंदी कायदा आणि स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा (रेरा) या दोन्ही कायदयाचे उल्लंघन करुन दस्त नोंदणी झाल्याचे तपासणी दरम्यान निदर्शनास आले आहे.

(२) नोंदणीकृत दस्तामध्ये आकारणी करण्यात आलेले मुद्रांक शुल्क व नोंदणी फी योग्य असून त्यामध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले नाही. मात्र अनियमितता आल्याचे निदर्शनास आले आहे.

नोंदणी विभागातील नोंदणी कार्यालयात झालेल्या तपासणीमध्ये तुकडेबंदी व रेरा कायदयातील तरतूदींचे उल्लंघन करुन दस्त नोंदणी झालेला प्रकरणात संबधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर निलंबन,बदली, विभागीय चौकशी,समज इ. कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(३) हवेली क्र.३ कार्यालयात दस्त नोंदणीमधील अनियमितता निदर्शनास आल्यानंतर पुणे शहरातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये मागील २ वर्षातील दस्तांमध्ये जोडण्यात आलेले एन.ए.आदेश/ भोगवटा प्रमाणपत्र /रेरा प्रमाणपत्र/गुंठेवारी नियमितीकरण दाखला, 'क', प्रत किंवा इतर कोणत्याही परवानग्या, ना-हरकत प्रमाणपत्र इ.बारकाईने पडताळणी करुन व सदर कागदपत्रे बनावट असल्याची साशंकता असल्यास, संबंधित प्राधिकरणाकडून सत्यता पडताळून घेऊन ज्या दस्तांमधील कागदपत्रे बनावट असल्याचे आढळून येईल, त्या दस्तांच्या बाबतीत नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ व कलम ८३ अन्वये कारवाई करण्याबाबत योग्य ते निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच उपरोक्त प्रकरणांमध्ये गैरव्यवहार/अनियमितता टाळण्यासाठी बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणी करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असून पोलिस आयुक्त, पुणे यांनाही त्यांचे अधिनस्त पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यास आवश्यक सहकार्य करण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील तरुणांची मेरीट ब्लु इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या खासगी संस्थेने लाखो रुपयांची फसवणूक केल्याबाबत

(३८) ४४७६८ (०२-०७-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक तरुणांची मेरीट ब्लु इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या खासगी संस्थेने सोशल मिडीयावर जाहीरातबाजी करुन नामांकित महाविद्यालयामध्ये वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार ठाणे येथे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे, चिपळूण, अकोला व जळगांवसह १५ ते २० तक्रारदारांची ५० लाख रुपयांहून अधिक रुपयांची फसवणूक झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात ठाण्यातील तक्रारदार श्रीनगर पोलिस ठाण्यात गेले असता तक्रार दाखल करुन घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित कंपनीवर व गुन्हा दाखल न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पुणे येथील एका तक्रारदाराची व ठाणे येथील ६ तक्रारदारांची एकूण रु. २९,५९,९००/- इतक्या रक्कमेची फसवणूक झाली आहे. चिपळूण, अकोला व जळगांव येथे याबाबत कोणत्याही तक्रारी दाखल नाहीत.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील श्रीनगर पोलीस ठाणे येथे गुरनं १०१/२०२२, भादंवि कलम ४२०,४०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(४) सदर प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुरनं ८३/२०२२ भादंवि कलम ४१९, ४२० सह माहिती तंत्रज्ञान अधि. कलम ६६सी, ६६डी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन आरोपी निष्पन्न झाले असून आरोपींचा शोध सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास सुरु आहे.

तसेच सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील श्रीनगर पोलीस ठाणे येथे गुरनं १०१/२०२२, भादंवि कलम ४२०,४०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात तीन आरोपी निष्पन्न झाले असून आरोपींचा शोध सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात खते, बियाणे व किटकनाशके यांचा तुटवडा असल्याबाबत.

(३९) ४५१२२ (३०-०६-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती

श्वेता महाले (चिखली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठया प्रमाणात बियाणे, किटकनाशके व रासायनिक खतांचा तुटवडा असल्याने शेतकऱ्यांना चढ्या दराने खरेदी करावी लागत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येत असल्याचे दिनांक १९ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच यंदा सोयाबीन बियाणाच्या किंमतीत लक्षणीय वाढ झाली असूनही बियाणांचा तुटवडा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शेतकऱ्यांना डी.ए.पी खत बॅगेसोबत इतर खत घेण्याची सक्ती केली जात असल्याचे दिनांक २३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच खते, बियाण्यांची कृत्रिम टंचाई व बोगस बियाणांची विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१३-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) सोयाबीन बियाणाच्या किंमतीत वाढ झालेली आहे हे खरे आहे. तथापि राज्यात सोयाबीन बियाणांचा तुटवडा झालेला नाही. खरीप-२०२२ हंगामाकरीता बियाणे बदल दरानुसार एकुण १२,०७,५०० क्विंटल बियाणांची आवश्यकता असून १४,१९,२४६ क्विंटल सोयाबीन बियाणांची उपलब्धता करुन देण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

शेतकऱ्यांना डी.ए.पी.खत बॅग सोबत इतर खत घेण्याची सक्ती करीत असल्याचे निदर्शनास आल्याने पाच कृषि सेवा केंद्राचे परवाने निलंबित व एक परवाना रद्द करण्यात आला आहे. तसेच राज्यात अनधिकृत कापूस बियाणांच्या एकूण १६ तक्रारींच्या अनुषंगाने एकूण ४४१४ पाकिटे व ६.३६ मे.टन खुले बियाणे मुल्य रु.७८.२६२ लाख रुपयाचा साठा जप्त करण्यात आला आहे. तर राज्यात इतर बियाणांच्या ४ तक्रारीच्या अनुषंगाने १५.२३ मे.टन बियाणे साठा मुल्य रु.३१८.६० लाख रुपयाचा साठा जप्त करण्यात आलेला असून या संदर्भात एकूण २० ठिकाणी पोलीस गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(६) विलंब झालेला नाही.

शिवडाव, उल्हासनगर, उत्तमनगर (ता. कणकवली ,जि. सिंधुदुर्ग) ही गावे गौणखनिज खाणपटटयांमुळे उध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याबाबत

(४०) ४५२०७ (२८-०६-२०२२). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडाव, उल्हासनगर व उत्तमनगर (ता. कणकवली,जि. सिंधुदुर्ग) येथील गौणखनिज खाणपटटयांमुळे सदर गावे उध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाणपटटयांच्या परवान्याची मुदत माहे मे व जून, २०२२ वा त्यादरम्यान संपत आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :(१),(२),(३),(४) व (५) होय हे खरे आहे.

मौजे शिवडाव व मौजे उल्हासनगर ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग येथील एकुण ०८ खाणपट्टयांपैकी ०५ खाणपट्टयांची मुदत माहे मे व जून,२०२२ रोजी संपलेली असून उर्वरित ०३ खाणपट्टयांची मुदत माहे डिसेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२५ पर्यंतची आहे.

तसेच मौजे उत्तमनगर येथे कोणतेही खाणपट्टे मंजूर करण्यात आलेले नाहीत.

मौजे शिवडाव व मौजे उल्हासनगर ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग येथील मुदत संपुष्टात आलेल्या ०५ खाणपट्टेधारकांपैकी ०३ खाणभाडेपट्टाधारकांनी महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील तरतुदीनुसार नुतणीकरणाचे अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग यांना सादर केले आहे.

मानखुर्द (मुंबई) येथे हेरोईन ड्रग्सची तस्करी करणाऱ्या एका महिलेस व वृद्धास गुन्हे शाखेने रंगेहाथ पकडल्याबाबत

(४१) ४५३४३ (०२-०७-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द (मुंबई) येथे लहान मुलांच्या पाण्याच्या बाटलीमध्ये हेरोईन लपवून ड्रग्सची तस्करी करणाऱ्या एका महिलेस व वृद्धास गुन्हे शाखेने पकडल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी उक्त पाण्याच्या बाटलीमध्ये लपविलेला पाच कोटी ८० लाख ५० हजार किंमतीचा हेरोईन साठा, ७६ हजारांची रोकड व दोन मोबाईल हस्तगत करण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर कारवाई करुन ड्रग्सची तस्करी रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०२२) : (१),(२) व (३) दि.०८.०४.२०२२ रोजी मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई व गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-३ यांनी केलेल्या कार्यवाहीत एका महिलेकडून व एका इसमाकडून १.९३५ कि.ग्रॅ. वजनाचा रू.५,८०,५०,०००/- इतक्या किंमतीचा पाण्याच्या बाटलीमध्ये लपवलेला हेरॉईन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. तसेच सदर आरोपितांकडून रू.७६,५००/- इतकी रोकड व दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.

सदर आरोपितांविरूध्द गु.र.क्र.०९/२०२२ एन.डी.पी.एस कायदा, १९८५ च्या कलम ८(क), २१(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपी सद्यस्थितीत न्यायालयीन कोठडीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पुणे विभागासह सहा भुमी अभिलेख विभागांमध्ये शेती, प्लॉट तसेच घराच्या मोजण्या प्रलंबित असल्याबाबत

(४२) ४५४१३ (२८-०६-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहा भुमी अभिलेख विभागांमध्ये शेती, प्लॉट व घरांच्या सुमारे १ लाख मोजण्या प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमी अभिलेख विभागातील सर्व्हेअरच्या ४५०० पदांपैकी १५०० पदे रिक्त असून विविध साहित्यांचा तुटवडा असल्यामुळे सदर मोजण्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याचा कोणताही निर्णय शासनाने अद्यापपर्यंत घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रलंबित मोजण्या तातडीने पूर्ण करणे, रिक्त पदे भरणे व साधनसामुग्री उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०८-२०२२) : (१) व २) हे खरे आहे.
(३) भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक/लिपीक) संवर्गातील एकूण १५०५ रिक्त पदापैकी १०२० पदे सरळसेवेने भरण्याकरीता दि.९.१२.२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, सदर पदभरती प्रक्रिया सुरू आहे.
(४) भूमि अभिलेख कार्यालयातील मे, २०२२ अखेर एकूण १,१४,६७४ मोजण्या प्रलंबित असून विभागाकडून मोजणी करण्याकरीता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार करण्यात येत आहे. त्यानुसार राज्यात एकूण ७७ कॉर्स स्टेशन उभारण्यात आले आहेत. तसेच ८२२ कर्मचाऱ्यांना लॅपटॉप पुरविण्यात आले असून २५० रोव्हर्स व कंट्रोलर्स व ३०० इटीएस मशीन खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विशेषत: कोकणातील मच्छिमारांना दिला जाणारा कोटयवधी रुपयांचा डिझेल परतावा तीन वर्षापासून थकीत असल्याबाबत

(४३) ४५६२७ (२८-०६-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: कोकणातील मच्छिमारांना दिला जाणारा कोटयावधी रुपयांचा डिझेल परतावा तीन वर्षापासून थकित असल्याचे दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मच्छीमार संस्थांना १०० टक्के डिझेल कोटा मंजूर केला असून डिझेल प्रती लीटर १२४ रुपये दराने विक्री करावे लागणार असल्याने मच्छीमार संस्था डिझेल कोटयातून उचल घेण्यास उत्सुक नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्वीप्रमाणेच प्रमाणेच किरकोळ विक्री दरानेच डिझेल पुरवठा करण्यात यावा अशी मागणी मच्छीमार संघटनांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आधीच कोकणातील किनाऱ्यावर वारंवार येणारी चक्रीवादळे, रासायनिक कंपन्यांमुळे होणारे प्रदूषण, घटणारे मत्स्योत्पादन आणि कोरोनाचे निर्बंध यामुळे मच्छिमार संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन मच्छिमारांचा थकीत डिझेल परतावा तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०८-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
१. सन २०२२-२३ करीता योजनेनुसार ७१३१ मासेमारी नौकांना १०० टक्के डिझेल कोटा मंजुर केला आहे.
२. शासन मान्य डिझेल पुरवठादार कंपनी मार्फत वितरीत डिझेलची किंमत ही बाजार पेठेतील डिझेल पंपावरील दरापेक्षा अधिक असल्याने, काही मच्छिमार संस्थांची डिझेल कोटा उचल कमी झाल्याचे दिसून येत आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

मागील कालावधीपासून संपूर्ण देशात सुरु असलेल्या कोरोना-१९ जागतिक महामारीमुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे मासे विक्री व्यवसायावर काही प्रमाणात परिणाम झालेला आहे. याच बरोबर अचानकपणे निर्माण झालेले चक्रीवादळ यामुळे मच्छीमारांना मासेमारीसाठी जाता आले नाही.

(५) राज्याच्या सागरी किनारपट्टीवर निर्माण झालेल्या चक्रीवादळामुळे मच्छिमारांना नुकसानीपोटी खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

बाब	वितरीत निधी(रू.लाखात)
क्यार महा चक्रीवादळ	४८२७.०२
निसर्ग	१३५.६९
तौक्ते	९२८.०६१६

हायस्पीड डिझेल तेलावरील विक्रीची प्रतिपूर्ती करणे या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ करिता रु.२१६.४१ कोटी इतक्या रकमेचा पूरक मागणी प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे .

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाडयातील टाकळखोपा व वाघाळा किर्ला या दोन रेती घाटांवरुन अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

(४४) ४५९३५ (२८-०६-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील टाकळखोपा व वाघाळा किर्ला या दोन रेती घाटांवर लिलावातील वाळूचे रात्रीच्या वेळेस उत्खनन होत असून तसेच लोणार परिसरातून "वाहतूकीस बंदी" या अटीचे उल्लंघन केले जात असल्याचे माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका रॉयल्टीवर अनेक वाहनांची वाहतूक करण्यात येऊन शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांचा देखील सहभाग आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :(१), (२), (३), (४) व (५) मंठा तालुक्यातील टाकळखोपा व वाघाळा किर्ला या दोन रेती घाटांवर लिलावातील वाळुचे रात्रीच्या वेळेस उत्खनन होत असल्यची बाब माहे एप्रिल,२०२२ मध्ये व त्यादराम्यान आढळून आलेली नाही.तसेच एकाच रॉयल्टीवर अनेक वाहनांची वाहतुक करून महसूल बुडविण्यात आल्याचेही निदर्शनास आले नाही.

मंठा तालुक्यात तालुकास्तरीय दिवस व रात्री करीता भरारी पथके स्थापन करून अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यात आला आहे.

राज्यात हिंगोली, ता. जिल्ह्यातील कानडखेडा खु. ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या पैनगंगा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

(४५) ४६०७३ (२८-०६-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील कानडखेडा खु. ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या कळबुर्गा चिंचपुरी, वाढोला येथील पैनगंगा नदी पात्रातून रात्रंदिवस अवैध वाळू उपसा होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पैनगंगा नदीपात्रातून सन २०१८ ते २०२१ या कालावधीत हिंगोली तहसील कार्यालयाने ४५० ब्रास वाळूसाठा जप्त केला तसेच सदर वाळूचा अद्यापपर्यंत कोणताच लिलाव न करता या वाळू साठ्याची परस्पर विल्हेवाट लावण्यात आली, हे ही खरे काय,
(३) तसेच माळहिवरा गोरेगाव मार्गावरील खंडाळा येथे अनेक दिवसापासून अवैध गौण खनिज वाहतुक मोठ्या प्रमाणात होत असतानाही प्रशासनाकडून कोणतीच कारवाई केली जात नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) ग्रामपंचायत कानडखेडा खु., ता. हिंगोली अतंर्गत असलेल्या कळदुर्गा चिंचपुरी, वाढोला येथील पैनगंगा नदी पात्रातून रात्रदिवस अवैध वाळु उपसा होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले नाही.

सन २०१८ ते २०२१ या कालावधीत पैनगंगा नदीपात्रातुन माहे जुन २०२० मध्ये १०० ब्रास वाळुसाठा आर्थीक दृष्टया दुर्बल घटकांकरीता राखीव ठेवण्यात आलेला असून सदर वाळुसाठयाची विल्हेवाट लावण्यात आलेली नाही.

माळहिवरा गोरेगाव मार्गावरील खंडाळा येथे कोणत्याही प्रकारची गौण खनिज वाहतुक झालेली नाही.

भरारी पथकाची स्थापना करून त्यामार्फत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर कार्यवाही करणेत येत आहे.

डहाणू (जि.पालघर) तालुक्यात मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गाच्या कामात बेकायदा उत्खनन झाल्याबाबत

(४६) ४६२०९ (२९-०६-२०२२). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गाच्या कामात मातीचा भराव टाकण्यासाठी संबधित कंत्राटदाराकडून चिखले येथील शेतकऱ्याच्या शेतात ४० फूट खोल खड्डा करुन माती उत्खनन तसेच ऐना गावातील आदिवासी शेतक-याच्या ६ एकर शेतजमिनीत बेकायदा उत्खनन करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त बेकायदा उत्खननाबाबत संबंधित कंत्राटदारावर गुन्हा दाखल करणे व नुकसान भरपाईची मागणी शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, डहाणू यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच मुंबई-वडोदरा एक्सप्रेस, विरार-डहाणू चौपदीकरण एम.यु.टी.पी, दिल्ली-मुंबई कॉरिडॉर बुलेट ट्रेन या चार प्रकल्पांच्या उभारणीसाठी नियमबाह्य पद्धतीने डोंगर खोदून यु.एम.एस.एल (UMSL) या कंपनीने कमी रॉयल्टी घेऊन मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर उत्खनन केल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात डहाणू वाणगाव पूर्वेकडील वाकीपाडा या आदिवासी पाडयाजवळ उक्त कंपनीने विनापरवानगी रेती व खडी या बांधकाम साहित्याची रॉयल्टी बुडविल्याप्रकरणी तहसीलदार, डहाणू यांनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कंपनीला नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार तक्रारीच्याअनुषंगाने दोषी कंत्राटदार तसेच बेकायदेशीर उत्खनन करणाऱ्या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) : (१),(२),(३),(४),(५) व (६) डहाणु तालुक्यात मुंबई-वडोदरा एक्सप्रेस वे च्या प्रकल्पासाठी चिखले येथील शेतकऱ्याच्या शेतात ४० फुट खड्डा करून माती उत्खनन केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही

मौजे ऐना सर्वे नंबर १५ क्षेत्र २.८१.३ हे.आर. या जागेत एकुण १२४७३ ब्रास माती उत्खनन केल्याचा अहवाल तहसिलदार, डहाणु यांना प्राप्त झाला. त्यानुषंगाने तहसिलदार, डहाणु यांनी संबंधीतास दिनांक ३०.०६.२०२२ रोजी दंडनिय नोटीस बजावली आहे.

सदर जागेत बेकायदा उत्खननाबाबत संबंधीत कंत्राटदारावर गुन्हा दाखल करणे व नुकसान भरपाईची मागणी बाबतचे निवेदन अथवा तक्रारी अर्ज संबंधीत शेतकरी यांनी उपविभागीय अधिकारी, डहाणु यांचे कार्यालयात सादर केलेले नाही.

तलाठी वाणगाव यांनी UMSL कंपनीने अनाधिकृत गौणखनिजाचा साठा केले प्रकरणी तहसिलदार, डहाणु यांना सादर केलेल्या अहवाल्याच्या अनुषंगाने तहसिलदार, डहाणु यांनी संबंधितांना दिनाक ३१.०१.२०२२ अन्वये रूपये ४१,९७८/- दंडनिय नोटीस बजाविण्यात आली आहे.

नांदगाव (ता.सुधागड, जि.रायगड) येथे पंचक्रोशित दिघेवाडी व अन्य गावात जनावरांना बोटोलिझम रोगाची लागण झाल्याबाबत

(४७) ४६३१२ (२८-०६-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (ता.सुधागड, जि.रायगड) येथे पंचक्रोशित दिघेवाडी व अन्य गावात ३० ते ३५ दुभत्या गाई, म्हशी व शेतीच्या कामायोग्य जनावरांना बोटोलिझम आजाराची लागण होऊन मृत्यूमुखी पडल्याचे दिनांक १७ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावातील जनावरांना बोटोलिझम आजाराची लागण होऊ नये याकरिता शासनाने कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकरी व पशुपालकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१०-२०२२) : (१), (२) व (३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, सदरचा रोग प्रादुर्भाव पशुधनास होवू नये म्हणून पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंधात्मक कार्यवाहीसाठी पशुपालकांमध्ये जनजागृती करण्यात आलेली आहे.

तसेच, मान्सूनपूर्व लसीकरण कार्यक्रमांतर्गत कार्यक्षेत्रातील एकूण ३०० जनावरांना घटसर्प व फऱ्या रोग प्रतिबंधक लस टोचण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथे ई - सेवा केंद्र चालक उत्पन्नाचे दाखले व प्रमाणपत्रे देताना निश्चित शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारत असल्याबाबत

(४८) ४६३७५ (२८-०६-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र विशेषत: पुणे येथे महा-ई-सेवा केंद्रांकडून विविध प्रकारचे ४२ शासकीय दाखले व प्रमाणपत्रे देताना नागरिकांची अडवणूक करून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याची बाब दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-सेवा केंद्रांच्या बेजबाबदार व नियमबाह्य पद्धतीला आळा घालण्याकरीता दक्षता पथक नेमून कार्यवाही करण्याबाबत पुणे जिल्हा मराठी एकीकरण समितीने लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नागरिकांची होणारी आर्थिक लुट थांबविण्याकरिता तसेच दोषी ई सेवा केंद्र चालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) : (१), (२) व (३) पुणे जिल्ह्यात आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येणा-या विविध सेवांसाठी निमयानुसार ठरवून देण्यात आलेले शुल्क आकारण्यात येत असून सदर केंद्रामार्फत अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

दक्षता पथक नेमून कार्यवाही करण्याबाबत पुणे जिल्हा मराठी एकीकरण समितीने लेखी पत्राव्दारे मागणी केलेली नाही. तथापि, जिल्ह्यातील महा-ई-सेवा केंद्रांची तहसिल कार्यालयाकडून वेळोवेळी तपासणी केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा , बपेरा व बावनथडी नदीमधून वाळु तस्करी होत असल्याबाबत

(४९) ४६८४५ (२८-०६-२०२२). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यामधुन वाहणाऱ्या वैनगंगा, बपेरा व बावनथडी नदीमधुन देवनार, चिखली, आष्टी, नाकाडोंगरी, वारपिंडकेपार व चांदमारा या रेती घाटावरून राज्यातील वाळु तस्कर वाळुची तस्करी करत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, उक्त रेतीघाटांवर दररोज ३०० पेक्षा जास्त वाहनांमार्फत वाळुची अवैध वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने वाळु तस्करांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :(१), (२), (३) व (४)

हे खरे नाही.

तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील 'ए वन हायजेज'' या मिरची बियाणे उत्पादक कंपनीने बोगस बियाणे देऊन शेतक-यांची केलेली फसवणूक

(५०) ४७८५१ (२८-०६-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील 'ए वन हायजेज'' या मिरची बियाणे कंपनीने मिरची उत्पादक शेतक-यांना बोगस बियाणे देऊन फसवणूक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हयाचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री यांचेकडे तक्रार केल्यानंतर मा.कृषी मंत्री यांनी चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश संबंधित कृषी अधिका-यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन बोगस बियाणे देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करणा-या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१३-१०-२०२२) :१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) तलासरी जि.पालघर तालक्यातील मिरची उत्पादक शेतकऱ्यांची निकृष्ट बियाणांबाबतची तक्रार प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तालुका तक्रार निवारण समितीने शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी केलेली आहे.

तालुका तक्रार निवारण समितीची निरिक्षणे व निष्कर्ष अहवाल संबंधीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आला असून त्यांना ग्राहक मंचात जाण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी बियाणे कायदा, १९६६ व बियाणे नियंत्रण आदेश, १९८३ मधील तरतूदींस अनुसरुन बियाण्याची अनुवंशिक शुध्दता तपासणीकरीता Grow Out Test व DNA Finger Printing Test करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर कायद्यातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तत्पूर्वी सदर वाणाच्या शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात आलेल्या तक्रारी, वाणांच्या गुणधर्मातील वेगळेपणा व कमी उत्पादन, या कारणामुंळे सदर मिरची पिकाचा गौरी हा वाण पुढील आदेश होईपर्यंत मुळ बियाणे विक्री परवान्यामधून निलंबित करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
नागपूर. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.